

# क्रांतीपर्व



## लोकशाहीप्रधान देशाची वाटचाल

प्रा. अमर जावळे

प्रा. भूषण काटे - पाटील

LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS

Scanned with CamScanner

# क्रांतीपर्व

## लोकशाहीप्रधान देशाची वाटचाल

**प्रा. अमर वसंत जावळे**
समन्वयक,सरदार पटेल अध्ययन व
संशोधन केंद्र.

**प्रा भूषण ज्ञानदेव पाटील**
समन्वयक, इंदिरा गांधी अध्ययन व
संशोधन केंद्र.

**LAXMI BOOK PUBLICATION**
**2018**

Scanned with CamScanner

LAXMI BOOK PUBLICATION

Price: 300 /-

# क्रांतीपर्व

## लोकशाहीप्रधान देशाची वाटचाल

प्रा. अमर जावळे  प्रा. भूषण काटे – पाटील

**© 2018 by Laxmi Book Publication, Solapur.**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, form or by any means, without prior permission of the author. Any person who unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them,

**ISBN– 978-0-359-01299-2**

**Published by,**
**Lulu Publication**
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

**Printed by,**
**Laxmi Book Publication,**
258/34, Raviwar Peth,
Solapur, Maharashtra, India.
**Contact No.** : 9595359435
**Website:** http://lbp.world/
**Email ID:** apiguide2014@gmail.com

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | पंतप्रधान इंदिराजी: आणीबाणी व वृत्तपत्रावरील सेन्सोरशिप | १ |
| २ | सरदार वल्लभभाई पटेल आणि राजस्थान | १२ |
| ३ | इंदिरा पर्वातील राष्ट्रीय आणीबाणी - एक अभ्यास | १६ |
| ४ | स्व.इंदिरा गांधीच्या छत्रछायेतील काही वर्ष | २३ |
| ५ | **संस्थान के विलीनीकरण मे सरदार वल्लभभाई पटेल कि भूमिका** | २८ |
| ६ | **स्व.इंदिराजी गांधी यांच्या कारकीर्दिमधून नेतृत्व विकासाचे धडे** | ३३ |
| ७ | संस्थानिकांच्या विलिनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | ३८ |
| ८ | Vallabhbhai Jhaverbhai Patel and Faizpur Congress १९३६ | ४२ |
| ९ | सरदार वल्लभभाई पटेल : एक उत्तम प्रशासक | ५४ |
| १० | स्वर्गीय इंदिरा गांधी :: एक कणखर महिला नेतृत्व | ५८ |
| ११ | भारतीय राजनिती का चमकता तारा :- इंदिरा गांधी | ६१ |
| १२ | भारताच्या आर्थिक विकासातील इंदिरा गांधीचे योगदान | ६४ |
| १३ | **श्रीमती इंदिरा गांधी यांचे परराष्ट्रीय धोरण व भारतीय सुरक्षा** | ७० |
| १४ | लोह पुरूष आणि लेडी सरदार | ७४ |
| १५ | देशप्रेमी प्रियदर्शनी इंदिरा | ७८ |
| १६ | अखंडीत भारताचे प्रेणेते :- सरदार वल्लभभाई पटेल | ८० |
| १७ | इंदिरा गांधी - एक कार्यकाल नेतृत्व | ८३ |
| १८ | भारतातील ग्रामिण वित्तीय व्यवस्थेत इंदिरागांधी यांचे योगदान | ८४ |
| १९ | इंदीरागांधी समग्र विचार : आधुनिक काळाची गरज | ९१ |
| २० | भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान एक कणखर नेत्या - श्रीमती इंदीरा गांधी | ९५ |
| २१ | आणीबाणी “विरोधकांची” | ९९ |


Scanned with CamScanner

# इंदीरा गांधी समग्र विचारः आधुनिक काळाची गरज


**प्रा.डॉ.संजय वामनराव भोळे**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख अप्पासाहेब र.भा.गरूड कला,

वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शेंदुर्णी ता.जामनेर जि.जळगांव.


**प्रस्तावना-**

स्वातंत्रोत्तर भारतामध्ये महिला नेतृत्वाच्या कार्याचा विचार करता भारतातील एक राजकीय क्षेत्रातील खणखर नेतृत्व म्हणून श्रीमती इंदीरा गांधी यांचा प्रामुख्याने विचार केला जातो.

जगाच्या पटलावर जेव्हा-जेव्हा स्त्रीयांच्या हक्क व अधिकाराबाबत चर्चा होते तेव्हा-तेव्हा जागतिक पातळीवर राजकीय पटलावर स्त्री नेतृत्व किती सक्षम होते याचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. एकंदरीतच जागतिक पातळीवर सक्षम स्त्री नेतृत्व आपणास दिसत नाही. याच अनुषंगाने भारतामध्ये इंदीरा गांधीच्या विचार व कार्यांचा अभ्यास करावा लागतो.

इंदीरा गांधी भारताच्या तिसऱ्या व पहील्या स्त्री पंतप्रधान म्हणुन जगापुढे आल्या. त्या भाषाप्रभु होत्या,अर्थशास्त्र , राज्यशास्त्र,विज्ञान व तंत्रज्ञान यासारख्या विषयांच्या बाबतीत त्यांचा हातखंडा होता. जगातील शास्त्रज्ञ,तत्वज्ञ,डॉक्टर,इंजिनीयर,मंत्री इ. च्या परिषदेत त्यांच्या भाषणांची एक वेगळीच छाप होती,अशी विद्वत्तासंपन्न व्यक्तीमत्व असणारी महिला राजकारणी स्त्री ही जगाला आश्चर्यकारक वाटत होती.

१९ नेव्हेंबर १९१७ रोजी अलाहाबाद येथे पंडीत नेहरू व कमला नेहरू यांच्या कुटूंबात जन्माला आलेल्या इंदीरा गांधी ह्या सर्वसामान्य लोकांच्या बाबतीत कळवळा असणाऱ्या नेत्या होत्या. इंदीरा गांधीजींच्या व्यक्तीगत जीवनात सार्वजनिकता अधिक होती.म्हणुनच त्या भारताच्या राजकारणात कार्य करतांना सर्वसामान्य लोकांना आपल्या वाटत असत, याच अनुषंगाने आधुनिक काळात त्यांच्या समग्र विचारांचा व कार्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## इंदीरा गांधी यांचे राजकीय विचार/वाटचाल

१९४७ साली भारताला फाळणीसह स्वातंत्र्य मिळाले आणि पंडीत जवाहरलाल नेहरू हे भारताचे पंतप्रधान झाले आणि तेव्हापासुन इंदीरा गांधींना नेहरुंच्या सहवासात राजकीय अभ्यासाचे धडे मिळायला सुरूवात झाली.१९५५ साली त्यांना काँग्रेस वर्कींग कमीटीवर घेतले.१९५९ मध्ये त्या भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या. ९ जून १९६४ साली भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणुन लालबहादुर शास्त्री पंतप्रधान झाले व त्यावेळी इंदीरा गांधी माहिती व नभोवाणी मंत्री म्हणुन कार्य करू लागल्या आणि पुढे १८ जानेवारी १९६६ या दिवशी भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान आणि पहिल्या स्त्री पंतप्रधान म्हणुन इंदीरा गांधी जगापुढे आल्या. त्यानंतर १९७७ पर्यंत राजकीय कार्य करत असतांना अनेक चढउतार त्यांच्या वाट्याला आले आणि त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या सत्तेवर झाला व पुढे १९७७ साली जनतापक्षाचे राज्य आले. १९८० मध्ये पुन्हा फेरनिवडणुका झाल्या



Scanned with CamScanner

आणि पुन्हा एकदा त्यांना भारताच्या पंतप्रधानपदाची सेवेची संधी मिळाली आणि गरिबी आणि विषमता यांचे निर्मूलन हे त्यांनी पुढे आपले कार्य मानले.अशा भूमीकेतून धाडसी कार्य करणाऱ्या इंदीरा गांधी यांचा ३१ ऑक्टोबर १९८४ साली अंत झाला आणि यांच्या अभूतपूर्व धाडसाने कार्य करणारे क्रांतीकारक वादळ शांत झाले.

**राजकीय विचार -**

इंदीरा गांधी यांच्या विचाराला कृतीची जोड होती, सर्वसामान्य माणूस डोळ्यासमोर ठेवुन इंदीरा गांधींनी आपली राजकीय कारकिर्द पुढे चालविली होती. सामाजिक न्याय महत्वाचा आहे. या भुमीकेतुन इंदीरा गांधींनी देशाच्या राजकारणात काही मुलभुत बदल घडविण्याचा प्रयत्न केला होता त्यासाठी संसद ही लोकांच्या आशा आकांक्षाचे उत्पत्तीस्थान आहे. म्हणून संसद ही समर्थ असली पाहीजे असा ठोस विचार त्यांनी मांडला होता.

यासाठी भारताची राज्यघटना महत्वाची आहे आणि भारतीय लोकशाहीच्या खऱ्या यशासाठी भारतीय राज्यघटना कालसापेक्ष असली पाहीजे तरच देशातील व्यवस्थेत अनुकुल बदल घडवु शकतील असा विचार इंदीरा गांधींनी मांडला होता. राज्यघटनेच्या मुल्याचे किंवा चौकटीचे उल्लंघन न होता कालानुसार राज्यघटनेत बदल झाले पाहीजे असे मत इंदीरा गांधींचे होते.

**भारतीय लोकशाही -**

स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही व्यवस्थेचा स्विकार केला. आमची लोकशाही नियोजनबद्ध आर्थिक विकासाला वाहिलेली आहे. आणि शांततेच्या मार्गांनी आम्हाला आमची जूनी समाजरचना बदलायची आहे.तरच भारताचा खरा विकास होईल असे मत इंदीरा गांधीचे होते. असे असले तरी लोकशाहीच्या या संरचनेमुळे सर्वसामान्य लोकांची दिशाभुल होता कामा नये स्वातंत्र्य,समता,न्याय,बंधुता या तत्वांचा खऱ्या अर्थाने वापर होतांना सर्वसामान्य जनता याची केंद्रबिंदू असली पाहीजे आणि यातुनच भारतातील खरी विषमता कमी झाली पाहीजे. सामाजिक लोकशाही व शांततामय सामाजिक परिवर्तन हे महत्वाचे मुल्य आमच्या लोकशाहीचे आहे. हा विचार इंदीरा गांधीजीच्या राजकीय विचारात सापडतो. म्हणुनच त्या म्हणतात की प्रगतीशील अर्थव्यवस्था आणि लोकशाही प्रधान समाज उभारण्याच्या भारताच्या प्रयत्नात आंतरराष्ट्रीय सहकार्य हा एक महत्वाचा घटक आहे आणि म्हणूनच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जागतिक शांतता आणि जागतिक सहकार्य या कल्पनांचा आमच्या राष्ट्र हिताच्या दृष्टीने आम्ही सतत पुरस्कार केला आहे.

**इंदीरा गांधी आणि काश्मीर प्रश्न -**

भारत एक संघराज्य आहे. त्यामुळे भारताच्या संघराज्याला बाधा येईल यासारखे कोणतेही वातावरण निर्माण होऊ दिले जाणार नाही अशी भूमीका इंदीरागांधी यांची होती.

जम्मु आणि काश्मीरचे राज्य आणि संघराज्य यातील घटनात्मक संबंध पुर्वी होते तसेच कायम राहतील आणि राज्यघटनेतील आणखी तरतुदी त्या राज्याला लागू करण्याच्या बाबतीत घटनेच्या ३७० व्या कलमान्वये जी पध्दती घालुन दिली आहे.तीच यापुढेही चालु राहील भारतीय संघराज्य व त्यांची घटकराज्य यांचे असलेले संबंध दुर्बल होऊ दिले जाणार नाहीत याच विचारातुन इंदीरा गांधींनी आपले राजकीय निर्णय घेतले होते.

या बाबत जम्मु काश्मीरचे मुख्यमंत्री शेख अब्दुला यांच्या बरोबर झालेल्या पत्रव्यवहारात त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले आहे की जम्मु आणि काश्मीरचे भवितव्य भारताशी निगडीत आहे आणि आपण स्वत: लोकशाही,निधर्मीपणा आणि समाजवाद यांच्यावर गाढ श्रध्दा बाळगणारे असल्यामुळे जम्मु आणि काश्मीर राज्य



Scanned with CamScanner

यांचे संबंध दृढ व्हावे म्हणून आपण सहकार्याचा हात सातत्याने पुढे करत आलो आहोत. जम्मू काश्मीर राज्यातील आणि भारताच्या इतर भागातील जनतेची उद्दीष्टे आणि ध्येय एकच आहेत आणि राष्ट्राच्या प्रगतीतील एक महत्वाची भूमिका आहे असे त्यांचे मत होते.

**इंदीरा गांधी यांची सामाजिक न्यायाची भुमिका -**

राजकीय सत्ता आणि सामाजिक न्याय या संकल्पना एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत अशी भूमिका इंदीरा गांधी यांची होती. त्यासाठी त्यांनी देशातील वस्तुच्या आयात निर्यातीचा प्रश्न महत्वाचा मानुन देशात वीज पुरवठा, वाहतुक अशा कारणामुळे औद्योगीक उत्पादन खुटत आहे. त्यामुळेच चलनवाढीचा किंवा परदेशातून आयात कराव्या लागणाऱ्या घटकांचा फटका भारतीय समाजव्यवस्थेला बसत आहे. त्यामुळे सामाजिक न्याय ही संकल्पना दुरापास्त होतांना दिसत आहे. असा विचार इंदीरा गांधींचा होता. त्यांचाही विचार आधुनिक काळात होणे गरजेचे आहे. या सर्व विचारात इंदीरा गांधींनी सर्वसामान्य घटकाबरोबरच कामगार, नौकरदार यासर्व वर्गांच्या विकासाकडे लक्ष दिलेले दिसून येते.

**इंदीरा गांधींचे समाजवाद विषयक विचार -**

इंदीरा गांधीं या समाजवादी विचारांच्या पुरस्कर्त्या होत्या निधर्मीपणा, लोकशाही आणि समाजवाद यातील स्तंभावर भारताची राजकीय व्यवस्था उभी आहे असे त्यांचे स्पष्टमत होते कारण इंदीरा गांधी म्हणत की भारतासारख्या गरीब देशात समाजवादाच्या मार्गाने लोकशाही गेली तर लोकशाहीला काहीच अर्थ उरणार नाही हे ही आपण जाणतो तरी सुध्दा दारिद्र्याविरूध्द आपल्याला लढा देण्यासाठी  समाजवादाशिवाय पर्याय नाही.

भारत हा निरोगी लोकशाहीचा देश बनवायचा असेल तर त्यासाठी समाजवादाचा विचार स्विकारवा लागेल कारण यातुन शेती, शेतमजुर व सर्वसामान्य वर्ग याचा विकास करावा लागेल. तरच राष्ट्राची खरी प्रगती झाली असे म्हणावे लागेल. त्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी सर्वसमावेशक अशा समाजवादी विचारांचा स्विकार करून देशाहिताकडे लक्ष दिले पाहीजे केवळ भाषणे किंवा पक्षाचे अजेंडे लोकांसमोर ठेवुन देश विकासाकडे वाटचाल करू शकत नाही त्यासाठी विविध कार्यक्रमाची आखणी करूण त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक असते असा मौलीक विचार इंदीरा गांधीजींचा होता.

**इंदीरा गांधी आणि परराष्ट्र धोरण -**

कोणत्याही देशाच्या अंतर्गत धोरणापासून त्यांचे परराष्ट्रधोरणे ही विभक्त करता येणार नाही कोणत्याही देशाने, सरकारने, राजकीय पक्षाने आपल्या श्रध्दा काय आहेत हे ठरविले पाहीजे आणि या मुलमुत श्रध्दातुनच सारे धोरणे निर्माण झाली पाहीजेत. भारताच्या परराष्ट्र धोरणा संदर्भात आणि अलिप्ततावाद हा घटक अत्यंत महत्वाचा आहे कारण अलिप्ततावाद ही भारताने ठरविलेली श्रध्दा आहे.

अलिप्ततावाद याचा अर्थ सर्व प्रश्नांचा स्वतंत्रपणे निर्णय घेण्यावर आमची श्रध्दा होय. कोणत्याही एका गटात देशाला बांधुन घ्यायचे नाही तर राष्टहितासाठी स्वतंत्र अशी भूमीका घ्यायची असा विचार भारताने अलिप्ततावादातुन स्विकारला आहे.

परराष्ट्रधोरण देशाच्या ऐतिहासीक आणि भौगोलिक पार्श्वभूमीवर आधारलेली असते. म्हणजे आपण जेथे असतो तेथुन आपण जग पाहतो दुसरे देश जीथे असतात तेथुन ते जग पाहतात. याभूमीकेतून भारताने आपली परराष्ट धोरणे ठरवुन भारत हा सामर्थ्यशाली किंवा संपन्न देश नसतांनाही काही गुणांच्या आधारे भारताने संपन्नतेची किंवा सामर्थ्याची उणीव भरून काढलेली आहे.



Scanned with CamScanner

**इंदीरा गांधींचे निधर्मीपणा व जातीयता संबधी विचार -**

इंदीरा गांधी नेहमी म्हणत की आमची परंपरा जातीयवादाची किंवा संकुचीत मनोवृत्तीची नाही तर ती सहींष्णुतेची व परस्पर देवघेवीची व शांततेने एकत्र राहण्याची आहे. आमच्या देशाला स्वातंत्र्य मिळवुन देणाऱ्या थोर पुरूषांनी आम्हाला ही शिकवण दिली आहे.आम्ही राष्ट्रीय शांतते बरोबर आंतरराष्ट्रीय शांतता स्विकारणारे आहोत.

भारताचा इतिहास या बाबतीत हा दिर्घकालीन आणि वैभव शाली असला तरी त्याचा भविष्यकाळही तसाच उज्वल राहील. आमच्या भारतात विविधतेतुन एकता निर्माण झालेली आहे.

जातीयवाद हा आमच्या देशासाठी गौण ठरणारा धटक आहे. त्यासाठी आम्ही सतत त्याचा निषेध केला आहे. आणि भविष्यातही त्याचा निषेध झाला पाहीजे.

बहुसंख्य अल्पसंख्य अशा भुमिकेतुन कोणत्याही जाती धर्मातील लोकांनी आपले आचरण करू नये यातून देशात अशांतता निर्माण होवुन देश अधोगतीकडे जातो त्याचा विकास कधीच होऊ शकत नाही असा मौलीक विचार इंदीरागांधींनी दिला होतो.

**निष्कर्ष -**

एकंदरीत भारताच्या राजकीय पटलावर स्वातंत्र्योत्तर काळात इंदीरा गांधींनी जी महत्वपुर्ण सर्व समावेशक अशी भूमीका बजावुन मौलीक राजकीय,सामाजिक,धार्मिक व देशहिताचे कार्य केले आहे ते कार्य एक महिला राज्यकर्त्या म्हणून वाखानण्याजोगे आहे. कारण भारताच्या इतिहासात राजसत्तेवर आजपर्यंत बोटाच्या कांड्यावर मोजण्या इतक्याच महीला आलेल्या आहेत. तेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र उगवत्या भारताच्या विकासाच्या दृष्टीने महत्वपुर्ण विचार मांडणाऱ्या व त्यादृष्टीने कार्यकरणाऱ्या इंदीरा गांधींजींचे योगदान आधुनिक काळात संस्मरणीय असेल म्हणून प.नेहरूंच्या विचारांचा वारसा घेऊन इंदीरा गांधींनी आपली राजकीय पाऊले उचलली आहेत. हे अंतीम सत्य आहे.

**संदर्भ -**


१. डॉ.वा.भा.पाटील, स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकीय विचारवंत,प्रशांत पब्लीकेशन जळगांव,प्रथम आवृत्ती २००९

२. जयकर- इंदीरा गांधी,राजहंस प्रकाशन पुणे,चौदावी आवृत्ती २०१२

३. वि.स.वाळिंबे, इंदीरागांधी. बंगलोर ते रायबरेली,अभिजीत प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती जून २०१२

४. प्रा.गौतम निकम,यशस्वीनी,विमलकीर्ती प्रकाशन,चाळीसगांव,प्रथम आवृत्ती ६ ऑक्टोंबर २०११




Scanned with CamScanner

# संपादक परिचय




**प्रा. अमर वसंत जावळे**

12 वर्षे अ. र. भा. गरुड महाविद्यालय येथे अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन

समन्वयक : सरदार वल्लभभाई अध्यापन व संशोधन केंद्र

जिल्हा समन्वयक : विद्यार्थी कल्याण विभाग उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ जळगाव.

संशोधन : लघु संशोधन प्रकल्प (युजीसी) पुर्ण, पी.एच.डी. संशोधन सुरु आहे. विविध विषयांवर शोध निबंध प्रकाशित, कार्यशाळा, चर्चासत्रांमध्ये सहभाग

पुरस्कार : उत्कृष्ट रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी पुरस्कार

संपादन : लोकसेवक





**प्रा. भूषण ज्ञानदेव पाटील**

10 वर्षापासून अ. र. भा. गरुड महाविद्यालय येथे मराठी विषयाचे अध्यापन

समन्वयक : इंदिरा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र

संशोधन : पी.एच.डी. संशोधन कार्य अंतिम टप्प्यात, लघु संशोधन प्रकल्प (युजीसी) पुर्ण, विविध विषयांवर शोध निबंध प्रकाशित राष्ट्रीय परिषद समन्वयक

संपादन : लोकसेवक

लेखन : महानाट्य – सत्यवादीची सिंहगर्जना,
1 लघुपट,
1 चित्रपट पटकथालेखन, दिग्दर्शन,
3 गीतांचे ध्वनीमुद्रण, दोन गीतांचा प्रायोगिक चित्रपटांमध्ये समावेश.



ISBN 978-0-359-01299-2
90000
9 780359 012992

Printed by
LAXMI
BOOK PUBLICATION, Solapur
Ph.: 0217-2372010 / +91-9595-359-435
Email.: aplguide2014@gmail.com
ayisrj2011@gmail.com
Website: lbp.world

Published by
Lulu.com
3101, Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States